महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : १६

# महाराजा सयाजीराव आणि बडोद्यातील वेदोक्त

राजश्री कदम



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : १६

# महाराजा सयाजीराव
# आणि
# बडोद्यातील वेदोक्त

राजश्री कदम

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव
आणि बडोद्यातील वेदोक्त
इतिहास
राजश्री कदम
●
प्रकाशन क्रमांक - ३६
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : राजश्री कदम
'दत्तकृपा निवास',
गर्ल्स हायस्कूल समोर, नवे पारगाव,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर,
४१६११३ मो. ८४२११२६५५४
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : २३ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/
  101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/
  1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# बडोद्यातील वेदोक्त

हिंदू चातुर्वर्ण्य व्यवस्थेत वेदोक्त आणि पुराणोक्त विधीच्या अधिकारासंबंधींचा वाद पुरातन काळापासून चालत आला आहे. हिंदू धर्मग्रंथांनी क्षत्रियांना वेदोक्त विधींचे अधिकार दिले असताना क्षत्रियांचे अस्तित्वच नाकारण्याचे प्रसंग इतिहासात आपल्याला वारंवार सापडतात. वेदोक्त हा शब्द 'वेद + उक्त' अशा दोन शब्दांच्या एकत्रीकरणातून तयार झाला आहे. त्याचा अर्थ 'वेदांत सांगितलेले' असा असून 'वेद मंत्रांनी व वेदकालीन ग्रंथांत सांगितलेल्या पद्धतीने धर्मकृत्य करणे' असा भावार्थ प्रचलित आहे. आधुनिक कालखंडात बडोद्याचे सयाजीराव महाराज (१८९६) व कोल्हापूरचे शाहू महाराज (१८९९) या महापुरुषांच्या वाट्याला हा संघर्ष आला.

विसाव्या शतकाच्या पूर्वसंध्येला बडोदा आणि कोल्हापूर येथे घडलेल्या वेदोक्तांपैकी कोल्हापूरचे वेदोक्त प्रचंड गाजले. त्या तुलनेत आजवर दुर्लक्षित राहिलेल्या बडोद्याच्या वेदोक्त प्रकरणात सयाजीरावांनी हुकुमाद्वारे १५ ऑक्टोबर १८९६ पासून

राजवाड्यातील धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीने करण्यास सुरुवात केली. त्या निमित्ताने बडोद्यानंतर केवळ ३ वर्षांतच घडलेल्या कोल्हापूर वेदोक्ताशी तुलना करत बडोद्याचे वेदोक्त समजून घेणे आपली 'धर्मसाक्षरता' वाढवण्यास उपयुक्त ठरेल. या तुलनेचा उद्देश बडोदा-कोल्हापूर वेदोक्तांमध्ये 'श्रेष्ठ-कनिष्ठता' ठरवण्याचा नसून या निमित्ताने या दोन प्रकरणांविषयीचे आपले आकलन परिपूर्ण व्हावे हाच आहे. यासाठी आपला इतिहास आणि महापुरुष यांना परस्परांशी जोडून आणि तुलनात्मक पद्धतीने अभ्यासणे ही आपली तातडीची गरज आहे.

सयाजीरावांनी आपल्या राजवाड्यातील सर्व धार्मिक विधी १५ ऑक्टोबर १८९६ च्या विजयादशमीपासून वेदोक्त पद्धतीने करण्याचा आदेश मे १८९६ मध्ये मसुरी स्वारीत काढला. तत्पूर्वी बडोद्याच्या राजघराण्यातील धर्मकृत्ये पूर्वपरंपरेनुसार पुराणोक्त पद्धतीने होत असत. सयाजीरावांनी जरी १५ ऑक्टोबर १८९६ पासून वेदोक्त पद्धतीची सुरुवात केली असली तरी सयाजीराव १८७७ पासूनच या दृष्टीने तयारी करत असल्याचे पुरावे त्यांच्या चरित्रात आपल्याला सापडतात. १८७७ मध्ये वयाच्या १४ व्या वर्षी सयाजीरावांनी अहमदाबाद येथे अस्पृश्यांसोबत सहभोजन केले. वयाच्या २० व्या वर्षी १८८३ मध्ये स्वतःच्या राजवाड्यातील खंडोबाचे मंदिर अस्पृश्यांसाठी खुले केले. १८८६ मध्ये राजवाड्यातील अस्पृश्यांसाठीच्या वेगळ्या पंगतीची पद्धत स्वतः त्या पंगतीत बसून मोडली.

## ऐनेराजमेहेल

१८८६ मध्येच राजवाड्यात होणाऱ्या धार्मिक कृत्यांचे अर्थ सांगणारा 'ऐनेराजमेहेल' ग्रंथ सयाजीरावांनी शंकर मोरो रानडे, कृष्णदेव महादेव समर्थ व भाऊ मास्तर यांच्याकडून तयार करून घेतला. इतर कोणत्याही कामात घेतले नसतील इतके कष्ट हा ग्रंथ परिपूर्ण करण्यासाठी महाराजांनी घेतल्याचे रियासतकार सरदेसाई सांगतात. १८९२ मध्ये सयाजीरावांनी राजवाड्याच्या देवघरातील धार्मिक विधींच्या खर्चाचे १,००० पानांचे तपशीलवार बजेट छापून पुस्तकरूपात प्रसिद्ध केले. तसेच दृष्ट काढण्याची प्रथासुद्धा महाराजांनी २९ मे १९०१ रोजी स्वतंत्र हुजूर हुकुमाद्वारे बंद केली. परंतु हा आदेश देताना महाराजांनी कोणाच्याही धार्मिक समजुतींना धक्का लागणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली होती. या आदेशात महाराजांनी तसे स्पष्ट नमूद केले. या आदेशानुसार, 'दृष्टी काढण्याचा रिवाज बंद करावा; परंतु देवभोळ्या समजुतीमुळेही खास-प्रसंगी कोणास दृष्ट काढल्याने सुख वाटत असल्यास तसी त्याच्या समजुतीस्तव काढण्यास हरकत नाही; मात्र होतकरू मुलांना देवभोळ्या समजुतीचा कित्ता होतं होईतोपर्यंत देऊ नये.' समाजजीवनातील धर्माचे स्थान विचारात घेऊन 'धर्मसाक्षरतेतून समाजपरिवर्तन' हा सिद्धांत आपल्या तुलनात्मक धर्मचिंतनातून १८७७ पासूनच राबवण्यास सुरुवात केली होती. या पार्श्वभूमीवर वेदोक्त हा एक त्यातील निर्णायक 'टप्पा' होता.

## धर्मसाक्षरता अभियान

'धर्मसाक्षरतेतून समाजपरिवर्तन' या सिद्धांताच्या विकासाचा एक भाग म्हणून १९१३ पासून अस्पृश्यांना संस्कृत शिक्षण, बडोदा कॉलेजमधील तत्त्वज्ञान आणि तुलनात्मक धर्म अभ्यासाचे अध्यासन (१९१६), 'गायकवाड स्टडीज इन रिलीजन अँड फिलॉसॉफी' ग्रंथमाला इ. च्या माध्यमातून जनतेचे धर्मविषयक प्रबोधन सयाजीरावांनी अखंड चालू ठेवले. स्वतंत्र भारताच्या कायदेमंडळात बाबासाहेबांना ज्या कायद्यासाठी संघर्ष करावा लागला त्या 'हिंदू कोड बिला'तील सर्व कायद्यांची अंमलबजावणी सयाजीरावांनी बडोद्यात १९०५ ते १९३३ या काळात केली होती.

## बडोदा वेदोक्ताचा प्रारंभ

बडोद्याच्या श्रावणमास दक्षिणेचे लाभार्थी असणाऱ्या शिवदत्त जोशींनी १८९१ मध्ये महाराजांच्या दौऱ्यावेळी जोधपूर येथे प्रत्यक्ष भेट घेऊन बडोद्याच्या राजघराण्यातील धार्मिक विधी रजपुतांप्रमाणे वेदोक्त पद्धतीने सुरू करण्याची विनंती केली. त्याआधी बरीच वर्षे श्रावणमास दक्षिणेच्या निमित्ताने बडोद्यात आल्यावर शिवदत्त जोशी लेखी अर्ज आणि प्रत्यक्ष भेटीद्वारे हा विषय वारंवार महाराजांच्या निदर्शनास आणून देत होते. कोल्हापूर येथील वेदोक्तामध्ये हीच भूमिका राजारामशास्त्री भागवतांनी पार पाडली. पहिल्या चिमणाबाई महाराणींच्या भगिनींकडील नेपाळच्या पाहुण्यांनी सयाजीरावांसोबत पंगतीस

बसण्यास नकार दिल्याचा अनुभव महाराजांच्या गाठीशी होता. जोधपूर स्वारीत रजपुतांमधील वेदोक्त विधी पाहिल्यानंतर बडोद्यातसुद्धा धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीने सुरू करण्याचा निश्चय महाराजांनी १८९१ मध्ये केला.

बडोद्यात परतल्यानंतर राजारामशास्त्री टोपले या खासगी देवघराच्या शास्त्रींशी सयाजीरावांनी चर्चा केली असता टोपलेंनी महाराज क्षत्रिय असून त्यांच्या देवघरातील धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीने करण्यास हरकत नसल्याचे मान्य केले. परंतु प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या वेळी टोपले महाराजांना म्हणाले, 'महाराज! आपण क्षत्रिय आहां वगैरे सर्व गोष्टी खऱ्या; परंतु या नवीन भानगडींत आपण पडणे इष्ट नाहीं. वेदोक्त म्हणजे एक विष आहे. ज्यांनी ज्यांनी म्हणून त्याजबद्दलचा हट्ट धरला त्यांचे कल्याण झालें नाहीं. त्यांच्या राज्यास अवनति प्राप्त झाली. सबब असल्या या विषाची परीक्षा आपण पाहूं नये.' असा सल्ला सयाजीरावांना देत टोपलेंनी वेदोक्त विधी करण्यास नकार दिला. पुढे त्यांनी स्वतःहून आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. अशीच हटवादीपणाची भूमिका कोल्हापूरच्या वेदोक्तात नारायणशास्त्री राजोपाध्ये यांनी घेतली. राजर्षी शाहूंनी त्यांना वार्षिक ३०,००० रु. चे वतन दिले. स्वतः शाहू महाराजांनी दोन-अडीच वर्षे समजूत घालण्याचे प्रयत्न करूनही राजोपाध्येंनी धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीने करण्यास टाळाटाळ केल्याने शाहू महाराजांनी त्यांना नोकरीवरून काढून टाकले.

## मराठा खानगी कारभाऱ्याची नेमणूक

ब्राह्मण शास्त्रींनी वेदोक्त विधींना टाळाटाळ केल्याने सयाजीरावांनी १८९५ मध्ये अप्पासाहेब मोहिते या मराठ्याची खानगी कारभारी म्हणून नियुक्ती केली. कारण वेदोक्त प्रकरणातील महाराजांची मूळ भूमिका सत्यात उतरवण्यास अप्पासाहेब मोहिते सर्वांत योग्य व्यक्ती होते. त्यांना या कार्यात नारायणराव घाटगे, आनंदराव पवार, तात्यासाहेब घाटगे, गोविंदराव दळवी, धामणस्कर, वणीकर इ. मंडळींनीही सहकार्य केले. ही वेदोक्तातील संघर्षाची पूर्वतयारी होती. १५ ऑक्टोबर १८९६ पासून राजवाड्यातील सर्व धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीने करण्याची जबाबदारी महाराजांनी त्यांच्यावर सोपवली. वेदोक्त विधी करण्यास नकार देणाऱ्या महाराष्ट्रीयन ब्राह्मणांना सयाजीरावांनी नोकरीवरून कमी करत त्यांची वतने जप्त केली.

याचबरोबर देवघरातील पूजा बडोदा सरकारच्या आदेशानुसार न करणाऱ्या नारायणशास्त्री, राजारामबुवा, केशवभट उपासनी, बाळंभट, गणेश मोरो जोशी, बाळाराम द्रविड, नारायण गोपाळ इ. मंडळींनाही महाराजांनी नोकरीवरून कमी केले. या मंडळींना कमी केल्यानंतर त्यांच्या जागी शिवदत्त, रेवाशंकर, जयशंकर नारोशंकर, रामचंद्रबुवा, जयशंकर जोशी, मोतीराम छोटालाल जोशी इ. लोकांची नियुक्ती केली. महाराष्ट्रीयन ब्राह्मणांच्या नकारानंतर सयाजीरावांनी राजवाड्यावरील दसऱ्याचे वेदोक्त विधी शिवदत्त जोशी, रेवाशंकर व भोलानाथ या गुजराती ब्राह्मणांकडून करून

घेतले. महाराष्ट्रीयन ब्राह्मणांनी राजवाड्यावरील भोजनावर बहिष्कार टाकल्यानंतर त्यांच्याऐवजी गुजराती ब्राह्मण किंवा इतर जातींमधील अनाथ, शारीरिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तींना भोजनास बोलावून अधिक पुण्य व समाधान मिळवण्याची भूमिका सयाजीरावांनी घेतली.

## बडोद्यातील वेदोक्तानंतरचा संघर्ष

राजवाड्यातील वेदोक्त विधी करणाऱ्या गुजराती ब्राह्मणांवर बहिष्कार टाकण्याची घोषणा ब्राह्मण वर्गाने केली. तसेच वेदोक्त विधींना विरोध करण्यासाठी ब्राह्मणांनी बडोदा शहरात जाहीर सभा घेतली. ब्राह्मणांच्या या विरोधाला बडोदा शहरातील अनेक प्रमुख मंडळींचा छुपा पाठिंबा होता. संस्थानाच्या राजधानीत महाराजांच्या धोरणाला टोकाचा विरोध असतानाही सयाजीरावांनी अविचाराने कोणतीही आततायी भूमिका न घेता 'शांतपणे' हा विरोध हाताळला. वेदोक्त विधी करण्यास तयार असणाऱ्या रामचंद्र पाचेगांवकर आणि नारायण देव या दोन ब्राह्मणांची खानगी देवघरात नेमणूक केली. या दोघांच्या पंक्तीला बसण्यास नकार देणाऱ्या अन्याबुवा नामक कीर्तनकारांना प्रथम नोकरीवरून कमी केले. चार-पाच वर्षांनंतर अन्याबुवा त्यांच्या माधव नामक मुलासह वेदोक्त विधी करण्यास तयार झाल्यानंतर सयाजीरावांनी त्यांना पुन्हा नोकरीत घेतले. या संदर्भातील रियासतकार सरदेसाईंचे निरीक्षण बोलके आहे. रियासतकार

लिहितात, 'कित्येक बाबतीत लोकांनी महाराजांचा उघड उघड उपमर्द व आज्ञाभंग केला असताही, महाराजांनी कोणाच्याही संबंधाने द्वेषबुद्धी धारण केली नाही अथवा आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून कोणासही शासन केले नाही.'

स्वतःहून राजीनामा दिलेले राजारामशास्त्री टोपले काही काळाने पुन्हा नोकरीवर रुजू झाले. तेव्हा वेदोक्ताचा प्रश्न सोडविण्यासंबंधी राजारामशास्त्रींनी महाराजांना दिलेला सल्ला रियासतकारांनी त्यांच्या 'श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांचा खासगी व कौटुंबिक वृत्तांत' या पुस्तकात नोंदवला आहे. बडोद्याच्या वेदोक्तासंदर्भात पुष्कळ शास्त्रींशी चर्चा करून राजारामशास्त्री टोपलेंनी महाराजांना सुचवले, 'वेदोक्तकर्म करण्यास हरकत नाही. परंतु आज पुष्कळ वर्षांचा प्रचार मोडून नवीन उपक्रम करावयाचा आहे; त्यास वाई, नाशिक, काशी वगैरे ठिकाणांहून मोठमोठी विद्वान शास्त्री, पंडित वगैरे मंडळी एकत्र करून त्यांच्या संमतीने हे काम करावे. अशी मंडळी जमा करून योग्य दक्षिणा वगैरे देऊन त्यांचा संतोष केल्याशिवाय ही गोष्ट सिद्धीस जाणार नाही. असे करण्यास निदान लाख दोन लाख तरी खर्च होईल; आणि असा खर्च करून महाराजांनी आपला लौकिक वाढविला म्हणजे वेदोक्त यशस्वी होईल.' टोपलेंनी सुचविलेला २ लाखांचा खर्च म्हणजे वेदोक्तासाठीची लाचच होती.

राजीनाम्याआधी वेदोक्ताला 'विष' संबोधणाऱ्या राजारामशास्त्रींच्या या सल्ल्याचा 'अर्थ' सयाजीरावांनी अचूक ओळखला. पैशाने अथवा अधिकाराने लोकांना वश करून कोणतीही सुधारणा करण्याच्या ठाम विरोधात असणाऱ्या सयाजीरावांनी राजारामशास्त्रींचा हा सल्ला धुडकावून लावला. यातून सयाजीरावांच्या 'धर्मसाक्षरता अभियाना'ची मूलभूतता स्पष्ट होते.

१५ ऑक्टोबर १८९६ पासून राजवाड्यात वेदोक्त विधी चालू करण्याचा आदेश देतानाच त्या विधींची 'साक्षरता' वाढवण्याचा सयाजीरावांनी 'जाणीवपूर्वक' प्रयत्न केला. राजवाड्यात वेदोक्त विधी सुरू केल्यानंतर महाराजांनी सर्व वेदोक्त विधींच्या संदर्भातील १६ संस्कारांच्या विधींचे रियासतकारांकडून मराठी भाषांतर करून घेऊन छापले. पॅलेस लायब्ररीचे ग्रंथपाल वासुदेव लिंगोजी बिर्जे यांचा 'क्षत्रिय आणि त्यांचे अस्तित्व' हा ग्रंथ सयाजीरावांच्याच आश्रयाने प्रकाशित झाला. कोल्हापुरात वेदोक्ताचा संघर्ष पेटल्यानंतर राजर्षी शाहूंचे क्षत्रियत्व सिद्ध करण्यासाठी पुरावा म्हणून बिर्जेंचा हा ग्रंथ बडोद्याहून मागवण्याबाबतची चर्चा कोल्हापूर दरबारात झाली होती. साताऱ्याच्या वेदोक्त प्रकरणावेळी प्रतापसिंह महाराजांचे क्षत्रियत्व सिद्ध करण्यासाठी उदेपुराहून कागदपत्रे आणण्यात आली. या कागदपत्रांबाबत राजर्षी शाहूंना पाठवलेल्या पत्रात सयाजीराव लिहितात, "सातारा येथील माझ्या मनुष्याला पत्र

लिहून त्याच्याजवळ कागदपत्र असतील तर ते आपल्या हवाली करण्यास कळवितो.” कोल्हापूरच्या वेदोक्त प्रकरणात राजर्षी शाहूंना सयाजीरावांनी दिलेल्या सक्रिय पाठिंब्याचा हा भक्कम पुरावा आहे.

## राजपुत्रांची वेदोक्त पद्धतीने मुंज

राजवाड्यात वेदोक्त विधींच्या प्रारंभानंतर दोनच वर्षांनी २८ मार्च १८९८ मध्ये सयाजीरावांनी उमरठ येथे राजपुत्र फत्तेसिंहराव, जयसिंहराव व शिवाजीराव यांच्या मुंजी वेदोक्त पद्धतीने केल्या. त्यांच्याबरोबर भाऊसाहेब गायकवाड व त्यांचे बंधू पिलाजीराव आणि विश्वासराव घाडगे यांच्याही मुंजी महाराजांनी यावेळी करून दिल्या. या मुंजीचा खर्च २३ हजार २९९ रु. इतका झाला. याचबरोबर १६ मार्च १९०५ रोजी धैर्यशीलराव आणि भाऊसाहेब यांची लक्ष्मीविलास राजमहालात मुंज करण्यात आली. तसेच यावेळी लालसिंहराव गायकवाड, यशवंतराव गायकवाड, सीतारामराव गायकवाड, गणपतराव शिर्के, भुजंगराव पवार, प्रतापराव शिंदे आणि उल्हासराव घाडगे या ७ मुलांच्याही मुंजी वेदोक्त पद्धतीने करण्यात आल्या. सयाजीरावांनी आपल्या राजपुत्रांच्या मुंजी वेदोक्त पद्धतीने करून घेतल्यामुळे वेदोक्ताला असणारा विरोध ‘लुळा’ पडला.

याउलट कोल्हापुरात मात्र राजर्षी शाहूंना वेदोक्त प्रकरणात जीवघेणा संघर्ष करावा लागला. या मुंजी झाल्यानंतर राजवाड्यात होणाऱ्या वेदोक्त विधींचा मूळ अर्थ व हेतू समजून

घेण्यासाठी सयाजीराव सरदेसाईंकडे दोन-तीन वर्ष संस्कृत शिकत होते. या संस्कृत शिक्षणाचे महत्त्व समजण्यासाठी डॉ. आंबेडकरांच्या आयुष्यातील एक प्रसंग उपयुक्त ठरतो. १९४६ मध्ये बाबासाहेबांनी लिहिलेला 'Who Were The Shudras' हा ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशित झाला. या पुस्तकात अस्पृश्यतेचा उगम मांडताना बाबासाहेबांनी दिलेले पुरावे दुय्यम स्रोतांवर आधारलेले आहेत असा आक्षेप घेत तत्कालीन विद्वानांनी हे संशोधन बाद ठरवले. केवळ संस्कृत ग्रंथातील पुरावे दिले नाहीत या एका कारणासाठी परीक्षकांनी या पुस्तकाचे ऐतिहासिक महत्त्व नाकारले. सयाजीरावांच्या संस्कृत शिक्षणाचे 'महत्त्व' या पार्श्वभूमीवर आपल्या लक्षात येईल.

## वेदोक्तामागील महाराजांची भूमिका

वेदोक्तासंदर्भातील धार्मिक सुधारणा घडवून आणताना केवळ लोक या धार्मिक बाबींना महत्त्व देत असल्यामुळे त्या योग्य पद्धतीने झाल्या पाहिजेत ही सयाजीरावांची भूमिका होती. केवळ ब्राह्मणांना धडा शिकवण्याची भावना यामागे नव्हती. महाराजांनी आपल्या मूर्तिसंग्रहासाठी गीतापाठ करणाऱ्या ब्राह्मणाचा पुतळा विकत घेतला होता. ही बाब याबाबत बोलकी आहे. वेदोक्तासंदर्भातील सयाजीरावांची भूमिका स्पष्ट करताना रियासतकार सरदेसाई लिहितात, 'धर्माच्या नावाखाली नाना प्रकारचे अनाचार समाजांत रूढ झाल्यामुळे देशाची अवनति होत आहे असे पुष्कळांस वाटून धर्म, समाज व गृहस्थिति सुधारण्याचे

प्रयत्न निरनिराळ्या ठिकाणच्या देशभक्तांनीं सुरू केले. अशा प्रयत्नांत श्रीमंत महाराजसाहेबांनी जो भाग आपल्या कारकीर्दीत घेतला त्यांतूनच हे वेदोक्त प्रकरण उपस्थित झाले. प्रकरण साधे असूनहि काही खटपटी व आपमतलबी लोकांच्या गवगव्यामुळें त्यास फाजील महत्त्व प्राप्त झाले. वास्तविक महाराजांनी हाती घेतलेल्या एकंदर सुधारणेचाच तो एक भाग होय. या पलीकडे त्यास स्वतंत्र असे फारसे महत्त्व नाही.'

१८९९ मध्ये पंचगंगेच्या तीरावर बसलेल्या 'झटक्यानंतर' शाहू महाराजांनी आपल्या बेधडक स्वभावानुसार या वर्णवर्चस्ववादी व्यवस्थेला 'धक्का' देण्याचा प्रयत्न केला. सयाजीरावांप्रमाणेच शाहू महाराजांनी ७ ऑक्टोबर १९०१ पासून राजवाड्यातील सर्व धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीने करण्याचा आदेश काढला. परंतु या आदेशाकडे ब्राह्मण वर्गाने कानाडोळा केल्याने २३ मे १९०३ रोजी हे प्रकरण मुंबईच्या गव्हर्नरकडे गेले. तर कोल्हापूरच्या राजोपाध्यांनी १९०५ मध्ये तत्कालीन व्हाईसराय कर्झनकडे यासंदर्भात अपील केले. पुढे हा संघर्ष राजर्षी शाहूंच्या मृत्यूपर्यंत चालल्याचे पुरावे आपल्याला शाहू महाराजांच्या पत्रव्यवहारात सापडतात. आपण राजे असल्यामुळे आपल्या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी झालीच पाहिजे ही शाहू महाराजांची भूमिका होती. याउलट सयाजीरावांनी मात्र आपल्या अधिकाराचा वापर करण्याआधी आदेशाची योग्य अंमलबजावणी होण्यासाठी जनतेचे सामाजिक आणि धार्मिक प्रबोधन करण्यावर अधिक

भर दिला. त्यासाठी आपल्या स्वभावाप्रमाणे सयाजीरावांनी भरपूर वेळ घेत परिपूर्ण नियोजन केले. एकच प्रकरण हाताळताना या दोन राजांच्या धोरणातील फरकामुळे दोन्ही ठिकाणच्या वेदोक्तांचे परिणाम वेगवेगळे झाले.

१९१५ मध्ये धर्मव्यवस्थेची अनिर्बंध सत्ता झुगारून देणारा जगातील एकमेव आणि क्रांतिकारक 'पुरोहित कायदा' बडोदा संस्थानात सयाजीराव महाराजांनी लागू केला. या कायद्यानुसार बडोदा सरकारकडून दरवर्षी घेतली जाणारी परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या सर्व जातीतील हिंदूंना पौरोहित्याची परवानगी देण्यात आली. त्याचबरोबर यजमानाला तो करत असलेल्या धार्मिक विधींचा अर्थ त्याच्या मातृभाषेत समजावून सांगणे पुरोहितांना बंधनकारक करण्यात आले. पुरोहित कायद्याद्वारे राजसत्तेच्या आधारे धर्मसत्तेला 'शिस्त' लावणारे सयाजीराव हे जगातील पहिले प्रशासक आहेत.

बडोदा आणि कोल्हापूर वेदोक्तांचा तुलनात्मक विचार करता दुर्दैवाने कोल्हापुरातील वेदोक्ताचे वादळ 'पेल्याबाहेर' आले. याउलट १८७७ पासून सयाजीरावांनी 'जाणीवपूर्वक' केलेल्या 'बौद्धिक' तयारीमुळे बडोद्यातील वेदोक्ताचे वादळ 'पेल्यातच' शमले. बडोद्याच्या वेदोक्ताला महाराष्ट्रात 'पेल्यातील वादळ' म्हणण्याची पद्धत आहे. परंतु बडोद्यातील वेदोक्ताला 'पेल्यातील वादळ' म्हणणे हे आपल्या 'अज्ञानाचे प्रदर्शन' ठरते. बडोद्यातील

वेदोक्ताची हाताळणी समजून घेतल्याशिवाय आजचे धर्म संघर्ष कसे हाताळायचे याची दिशा सापडणार नाही. सयाजीरावांच्या बडोद्यातील वेदोक्तासंदर्भातील हा गौरवशाली इतिहास समजून घेणे आपली 'धर्मसाक्षरता' वाढवण्यास नक्कीच उपकारक ठरेल.

•••

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर
- दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव
- डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर
- सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई
- दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव
गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील
- शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह
- देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद
- डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा
- राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती
- निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर
- सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक
कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण
परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा
- राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि
जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम
राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**<u>मराठी :</u>**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**<u>English</u>**

- Spechess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**<u>हिन्दी :</u>**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com